# <u>जाहीर सूचना</u>

## वाळू लिलाव सन २०११-१२

**<u>अहमदनगर जिल्हयातील नदीपात्रातील वाळूस्थळांचे सरकारी किंमत २५% ने कमी करुन फेर लिलाव</u>**

जाहीर सूचना देण्यात येते की, अहमदनगर जिल्हयातील खालील तालुक्यातील गावांचे नदीपात्रामधील वाळूस्थळांचे सरकारी किंमत २५% ने कमी करुन फेरलिलाव करण्यात येणार आहे.

| अ. क्र. | उपविभाग | तालुका | फेरलिलाव दिनांक व वेळ | लिलावाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १. | श्रीरामपूर | श्रीरामपूर, राहाता, राहुरी | दि. ०२/०३/२०१२ सकाळी ११.०० वाजता | प्रियदर्शनी सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर |
| २. | कर्जत | कर्जत, श्रीगोंदा, जामखेड | | |
| ३. | नगर | पारनेर, शेवगांव | | |
| ४. | संगमनेर | संगमनेर, अकोले | | |

लिलाव करावयाच्या वाळू घाटांची यादी, लिलावाच्या अटी व इतर माहिती सर्व तहसिल कार्यालय, सर्व उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, गौण खनिज शाखा,अहमदनगर व www.ahmednagar.nic.in या संकेतस्थळार उपलब्ध राहील.

सही/XXX
(डॉ.संजीवकुमार)
**जिल्हाधिकारी अहमदनगर**

क्रमांक गौख/कार्या-४ /वाळूलिलाव/२९९/२०१२
जिल्हाधिकारी कार्यालय, गौण खनिज शाखा,
अहमदनगर दिनांक २१/०२/२०१२

# <u>जाहीर प्रगटन</u>

## (वाळूस्थळांची सरकारी किंमत २५% ने कमी करुन फेरलिलाव)

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सन २०११-२०१२ (दि.३१.०७.२०१२ अखेरचे मुदतीकरीता) या वर्षाकरीता अहमदनगर जिल्हयातील **श्रीरामपूर/ कर्जत/ संगमनेर/ नगर उपविभागातील** खाली दर्शविलेल्या गावामधील नदी पात्रातील वाळुसाठयामधील वाळू काढण्याच्या हक्कांचे, **जसे आहेत तशा स्थितीत (As is where is basis) फेरलिलाव (सरकारी किंमत २५% ने कमी करुन फेरलिलाव)**, खुल्या लिलावाद्वारे तसेच सिलबंद निवीदा पध्दतीने सन २०११-१२ या वर्षाकरिता (दि.३१.०७.२०१२ अखेरचे मुदतीसाठी) **दिनांक ०२/०३/२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रियदर्शनी सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर** येथे होणार आहेत.

मुंबई गौण खनिज उत्खनन नियम १९५५ मधील नियम ३९ (ए) व शासन निर्णय क्र.गौखनि१०/०२०८/प्रक्र३२/ख दिनांक २५/१०/२०१० मधील तरतुदीनुसार, रिट याचिका क्र.४८३०/२०१० मध्ये दि.२६/१०/२०१० रोजी मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी दिलेल्या निर्णयातील मार्गदर्शक सुचनेनुसार व मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र क्र.मशा.कार्या-२/जमीन - १/प्रक्र.वाळू लिलाव/२०१२ दि.२१/०२/२०१२ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार अहमदनगर जिल्हयातील श्रीरामपूर/ कर्जत/ संगमनेर/ नगर उपविभागातील खालील दर्शविलेल्या वाळूसाठयांचे सरकारी किंमत २५% ने कमी करुन फेरलिलाव आयोजित केलेले आहेत.

**फेरलिलावासाठीचे वाळूसाठे :-**

| अ. नं. | तालुका | वाळूस्थळाचे नांव | नदीचे नांव | लगतचे गट नं./ स.नं. | लिलावासाठी शिफारशीत वाळूसाठा (ब्रास) | सरकारी किंमत (अपसेट प्राईस) | २५% ने कमी करुन आलेली सरकारी किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **राहुरी** | राहुरी खु. क्र.१ | मुळा | ग.नं.८७, ९५ | ४००० | ४०००००० | ३०००००० |
| २ | | देसवंडी क्र.१ | मुळा | ग.नं.४२, ४६ लगत | २००० | २०००००० | १५००००० |
| ३ | | देसवंडी क्र.२ | मुळा | ग.नं.५६, ५७ लगत | ५०० | ५००००० | ३७५००० |
| ४ | | देसवंडी क्र.३ | मुळा | ग.नं.८२/१, ८२/२, ८३ | ४००० | ४०००००० | ३०००००० |
| ५ | | धानोरे क्र.१ | प्रवरा | ग.नं.३२४ ते ३४८ चे बांधालगत | ८००० | ८०००००० | ६०००००० |
| ६ | | धानोरे क्र.२ | प्रवरा | ग.नं.३६० ते ३७२ लगत | १२७५० | १२७५०००० | ९५६२५०० |
| ७ | | वळण क्र.१ | मुळा | ग.नं.५५, ५७, ५४, ४९, ४७, ४६, ४५, ४१ | ३५०० | ३५००००० | २६२५००० |
| ८ | | दरडगांवथडी क्र.१ | मुळा | ग.नं.१/१००, ६/१०६, ५/१०४, ४/१०३ लगत | ७५०० | ७५००००० | ५६२५००० |
| ९ | | दरडगांवथडी क्र.२ | मुळा | ग.नं.३/१०२, २/१०१, ४७, ४५ लगत | ७५०० | ७५००००० | ५६२५००० |
| १० | | दरडगांवथडी क्र.३ | मुळा | ग.नं.४३, ४२, ३९, ३६ लगत | ६००० | ६०००००० | ४५००००० |
| ११ | | सोनगांव क्र.१ | प्रवरा | ग.नं.४८० ते ४९९, धानोरे घाट लगत | ७००० | ७०००००० | ५२५०००० |
| १२ | | सोनगांव क्र.२ | प्रवरा | ग.नं.१ ते पिंपळाचे झाड ते सात्रळ शिवलिंबाचे झाड, ग.नं.१० ते १४ लगत | ७२५० | ७२५०००० | ५४३७५०० |
| १३ | | कोंढवड क्र.१ | मुळा | ग.नं.२५८, २५९, २६१, २६२, २६३, २६८, २७७, २७८, २८१, २८३, २८४ | ४००० | ४०००००० | ३०००००० |
| १४ | | कोंढवड क्र.२ | मुळा | ग.नं.२८७, २८९, २९०, ११, १३, १४, १५, १८, १९ लगत | ४००० | ४०००००० | ३०००००० |
| १५ | | तांदुळवाडी क्र.१ | मुळा | ग.नं.८, ७, २३, ६, ५, ४ व २ लगत | ४८०० | ४८००००० | ३६००००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १६ | **राहाता** | हणमंतगांव क्र.१ | प्रवरा | ग.नं.३० ते ३७, ६८, ७०, ७१, ७४, ७६ ते ७९, ८१, ८५, ८६ ते ९१, ११९ ते १२६ लगत | १५००० | १५०००००० | ११२५०००० |
| १७ | | हणमंतगांव क्र.२ | प्रवरा | ग.नं.४३१, १३०, १३२, १३५, १३६ लगत नकाशाप्रमाणे | २००० | २०००००० | १५००००० |
| १८ | | पाथरे बु. १ | प्रवरा | ग.नं.१३ ते १७, २९, ३०, ४० ते ४४ गावठाण लगत | ३००० | ३०००००० | २२५०००० |
| १९ | | पाथरे बु. २ | प्रवरा | ग.नं.४५ ते ५१, ५३, ५५, ५८, ५९, ६४ लगत | ३००० | ३०००००० | २२५०००० |
| २० | **श्रीरामपूर** | बेलापूर खु. | प्रवरा | ग.नं.४१९, ४२२, ४२८, ४३४, ४३९, ४२१, ४३२, ४३५ | १९५० | १९५०००० | १४६२५०० |
| २१ | | बेलापूर बु. | प्रवरा | ग.नं.२०, २९ ते ३१, ३५, ३४ | २३०० | २३००००० | १७२५००० |
| २२ | | वळदगांव | प्रवरा | ग.नं.६, ८, ९ ते ११ व १२ | ७०० | ७००००० | ५२५००० |
| २३ | | भेर्डापूर क्र.२ | प्रवरा | ग.नं.२०, २३, २२ | १४०० | १४००००० | १०५०००० |
| २४ | | भेर्डापूर क्र.३ | प्रवरा | ग.नं.२८६, २८९ व ३२९ | ८०० | ८००००० | ६००००० |
| २५ | | कुरणपूर | प्रवरा | ग.नं.१, २, २५५ ते २५८, २५०/१, २५०/२, २४२, २४५, २४७ व २४८ | ७००० | ७०००००० | ५२५०००० |
| २६ | | पढेगांव | प्रवरा | ग.नं.५१, ५२ | १००० | १०००००० | ७५०००० |
| २७ | **श्रीगोंदा** | अजनुज साठा क्र.१ | भिमा | ग.नं.२, ३, ६, ७, ८,९, १०, १२, १३, २१ ते ३२, ३३, ३५, ३६ लगत | १८५०० | १८५००००० | १३८७५००० |
| २८ | | अजनुज साठा क्र.२ | भिमा | ग.नं. ५०४ ते ५०६, ४९८, ४८४, ४८५, ४८६, ४७०, ४७१, ५०८,४७२, ४४९ ते ४५२, ४६१, ४५६, ४५४, ४५३ ते ४४५, ४४७ लगत | १६००० | १६०००००० | १२०००००० |
| २९ | | आर्वी साठा क्र.१ | भिमा | ग.नं.७९ ते ८८, ८३, ८२, ९१, ७६ लगत | १३५०० | १३५००००० | १०१२५००० |
| ३० | | आर्वी साठा क्र.२ | भिमा | ग.नं.९२, ९३, ९६, ९७, १०३ लगत | २५०० | २५००००० | १८७५००० |
| ३१ | | अनगरे साठा क्र.२ | भिमा | ग.नं.१३५ ते १३८, ९३/३, १२०, १२१ लगत | १३०० | १३००००० | ९७५००० |
| ३२ | | कौठा साठा क्र.१ | भिमा | ग.नं.१२२, १२३, १२०, १११, ११२, ११३, १०० ते १०३, ९९९ लगत | ३००० | ३०००००० | २२५०००० |
| ३३ | | हिंगणी दुमाला साठा क्र.१ | घोड | गव्हाणेवाडी शिव ते राजापूर शिव लगत नकाशाप्रमाणे | १००० | १०००००० | ७५०००० |
| ३४ | | गव्हाणेवाडी | घोड | कुरुंद ता.पारनेर शिवेपासून हिंगणीदुमाला शिवेपर्यत नकाशाप्रमाणे | ८५० | ८५०००० | ६३७५०० |
| ३५ | | बोरी | घोड | ग.नं.२२२,६३,६५,६६,६७,१ ते १६, ७३,७४,८७,५६ ते ८३ | २५०० | २५००००० | १८७५००० |
| ३६ | | गार साठा क्र.१ | भिमा | ग.नं.१३६ पैकी १०७,१०४ | ७००० | ७०००००० | ५२५०००० |
| ३७ | | गार साठा क्र.२ | भिमा | ग.नं.१३६ पैकी | ४००० | ४०००००० | ३०००००० |
| ३८ | | वांगदरी | घोड | ग.नं.१४ ते १९, २७०, २६३, २६७ लगत | ४००० | ४०००००० | ३०००००० |
| ३९ | | डोमाळेवाडी | घोड | ग.नं.९१,९२,८७,९३,९४ लगत | ४००० | ४०००००० | ३०००००० |
| ४० | | काष्टी साठा क्र.१ | घोड | नकाशाप्रमाणे | ६००० | ६०००००० | ४५००००० |
| ४१ | | काष्टी साठा क्र.२ | घोड | नकाशाप्रमाणे | ५५०० | ५५००००० | ४१२५००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४२ | | सांगवी दुमाला क्र.१ | घोड | ग.नं.३७ ते ३५ , २, ११ , १२ , २० , २१,२५,२८,२९,३२,३५,३६, १ मीटर खोलीचे | ८००० | ८०००००० | ६०००००० |
| ४३ | | सांगवी दुमाला क्र.२ | भिमा | ग.नं.२७१ ते २७५, २३३ ते २३९, २२७, २२९, २३१ ते २२४ १ मीटर खोलीचे | १०००० | १०००००००० | ७५०००००० |
| ४४ | | पेडगांव साठा क्र.१ | भिमा | ग.नं.६३७,६३६,६३४,६३२,६३१ | ४००० | ४०००००० | ३०००००० |
| ४५ | | पेडगांव साठा क्र.२ | भिमा | ग.नं.१२ ते १६ व २५ | ६००० | ६०००००० | ४५००००० |
| ४६ | | निमगांव खलु क्र.१ | भिमा | ग.नं.३९ ते ७ ते २२, ६३ ते ५८, ४०/१, ४२, ४३, ४७ | ४००० | ४०००००० | ३०००००० |
| ४७ | | निमगांव खलु क्र.२ | भिमा | ग.नं.४०२,४०१,४९० | ४५०० | ४५००००० | ३३७५००० |
| ४८ | **कर्जत** | सिध्दटेक | भिमा | १३६ ते १४२, १ ते ११, १९ ते २२, २४, २८, २९ इ. | १०००० | १०००००००० | ७५०००००० |
| ४९ | | देऊळवाडी | भिमा | गट नं.३ | ७००० | ७०००००० | ५२५०००० |
| ५० | | दुधोडी साठा क्र.१ | भिमा | ग.नं.१३, १८, १९, २१, २६, २७, ३० | ३००० | ३०००००० | २२५०००० |
| ५१ | | दुधोडी साठा क्र.३ | भिमा | गट नं.१८० ते १८२ १८४ ते १९३, १९५ ते १९९, २०१, २१८ ते २२२ | १०००० | १०००००००० | ७५०००००० |
| ५२ | | बेर्डी साठा क्र.१ | भिमा | ४, ५, ६, ७, ८, ९ | ६००० | ६०००००० | ४५००००० |
| ५३ | | जलालपूर साठा क्र.१ | भिमा | गट नं.३४७ ते ३४९, ३७१ ते ३७९, ३८१, ३८२ | ७००० | ७०००००० | ५२५०००० |
| ५४ | | जलालपूर साठा क्र.२ | भिमा | गट नं.३२७ ते ३३९, ३४३, ३४४, ३४६ | ७००० | ७०००००० | ५२५०००० |
| ५५ | | बेलगांव | सिना | ३०,१३३/१,२,३, १३४, १३५/१,२,३ | १२०० | १२००००० | ९००००० |
| ५६ | | सितपूर | सिना | ६५,६६,७०,७१,१,२,३,४,५,६,७,८, | ४९०० | ४९००००० | ३६७५००० |
| ५७ | | निंबोडी | सिना | ९२,९४,९५,९८,९९,१,२,३, | १४०० | १४००००० | १०५०००० |
| ५८ | | भांबोरा क्र.१ | भिमा | गट नं.७५६ ते ७५८, ३०२, ३०१, ७५१, २९७, ३२८ | ३००० | ३०००००० | २२५०००० |
| ५९ | | भांबोरा क्र.३ | भिमा | गट नं.७४२, ७३७ ते ७४१, ७३६, ७३५, ७३४, १९५, ७६६, ७२८,७२७, ७२२,७६५, ७१७ ,७६८, ७६७ | ४००० | ४०००००० | ३०००००० |
| ६० | **जामखेड** | जातेगांव | मांजरा | ८७७, ८३९, ८८७ लगत | ७५० | ७५०००० | ५६२५०० |
| ६१ | | जवळा साठा क्र.१ | नांदणी | ६३१, ३४५ ते ६४८, ६७४,६७५,६७७ ते ६८१, ६८७ ते ६८९ लगत | १२०० | १२००००० | ९००००० |
| ६२ | | जवळा साठा क्र.२ | नांदणी | १२५०, १२५३ ते १२५७, १२६९, १२६२ १२८४, १३१५ ते १३१८ लगत | १७०० | १७००००० | १२७५००० |
| ६३ | | माळेवाडी क्र.१ | मांजरा | १५५, १६३ लगत | ५०० | ५००००० | ३७५००० |
| ६४ | | आघी क्र.१ | सिना | २७८,२७७,२७६,२६०,२५७ लगत | १२०० | १२००००० | ९००००० |
| ६५ | | आघी क्र.२ | सिना | २५१, २५०/१ लगत | ५०० | ५००००० | ३७५००० |
| ६६ | | धानोरा (वं) | विंचरणा | १६,१७,१८,१९,२०,२५ लगत | ७०० | ७००००० | ५२५००० |
| ६७ | | दिघोळ | मांजरा | १०३,१०४,१०५,१०६,१०७,१४०,१३९,११०,१०९ लगत | ५५० | ५५०००० | ४१२५०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६८ | **संगमनेर** | प्रतापपुर | प्रवरा | ग.नं.२८, २९, ३७, २७, २५, ४ ते २०, १६, १२, ११,१०,९,७,६,५,लगत | १०००० | १०००००००० | ७५०००००० |
| ६९ | | उंबरी बाळापूर | प्रवरा | ग.नं.९० ते ९२, १०७, ९, ११, ११९, १३४, १३५, १३७, १४४ ते १४७ लगत | १०००० | १०००००००० | ७५०००००० |
| ७० | | ओझर खुर्द | प्रवरा | ग.नं.५३१ ते ५३७, ५३८, ५४०, ५४२, ५६६, ५७०, ५८७ते ५९०, ५९१, ५९२, ५९४ लगत | ४००० | ४००००००० | ३०००००० |
| ७१ | | शिबलापूर | प्रवरा | ग.नं.३११, २९९ ते ३१० लगत | १२०० | १२०००००० | ९०००००० |
| ७२ | | शेडगांव | प्रवरा | ग.नं.५८०, ५८१, ५८६, ५९७, ५९३, ५९४, ५९५, ५९६, ५९७, २९ ते ३४, ४४, ४६ ते ४८, ५३ ते ६१ लगत | १०००० | १०००००००० | ७५०००००० |
| ७३ | | कौठे बु. | मुळा | ग.नं.२९५, २९९, २९४, २९६,२९७, २९८ लगत | ४५०० | ४५०००००० | ३३७५००० |
| ७४ | | नांदुर खंदरमाळ क्र.२ | मुळा | खैरदरा मुळा डॅम संपादीत जमिनीलगत | ५००० | ५००००००० | ३७५०००० |
| ७५ | | संगमनेर खुर्द | प्रवरा | ग.नं.१२, १३, १४, १६ लगत | ३५०० | ३५०००००० | २६२५००० |
| ७६ | | गुंजाळवाडी | म्हाळुंगी | ग.नं.१७०, १६९ लगत | १५०० | १५०००००० | ११२५००० |
| ७७ | | ढोलेवाडी | म्हाळुंगी | ग.नं.२० लगत | १५०० | १५०००००० | ११२५००० |
| ७८ | | धांदरफळ बु. क्र.२ | प्रवरा | ग.नं.२, ३, ६ लगत | ५०० | ५०००००० | ३७५००० |
| ७९ | | धांदरफळ बु. क्र.६ | प्रवरा | ग.नं.३७६ लगत | १२०० | १२०००००० | ९०००००० |
| ८० | | निमज क्र.१ | प्रवरा | ग.नं.२४, २५, २६ लगत | २५०० | २५०००००० | १८७५००० |
| ८१ | | निमज क्र.२ | प्रवरा | ग.नं.१५, १७, १९ लगत | ७५० | ७५००००० | ५६२५०० |
| ८२ | | कनोली क्र.१ | प्रवरा | ग.नं.५३१ ते ५३८, ५४१, ५४२, ५६९, ५७०, ५८७, ५८८, ५८९, ५९०, ५९१, ५९२, ५९४, ५९५ ते ५९८, ६१९, ६१८, ६२१, १ ते ८, १०, ११, १२, १५, १६, १७, १८, १९ लगत | १५००० | १५०००००० | ११२५०००० |
| ८३ | | निंबाळे | प्रवरा | ग.नं.१९, १६, १५ व १३ लगत | ४५०० | ४५०००००० | ३३७५००० |
| ८४ | **अकोले** | कुंभेफळ वाळूसाठा क्र.२ | प्रवरा | ग.नं.९८ | १००० | १०००००० | ७५०००० |
| ८५ | **पारनेर** | कुरुंद साठा क्र. १ | घोड | ३३६, ३३७ लगत | २५०० | २५०००००० | १८७५००० |
| ८६ | | कुरुंद साठा क्र. २ | घोड | ३३२ लगत | २००० | २००००००० | १५०००००० |
| ८७ | | कुरुंद साठा क्र. ३ | घोड | ३२० ते ३२७ लगत | १५०० | १५०००००० | ११२५००० |
| ८८ | | कोहकडी | कूकडी | म्हसे शिव लगत गट क्र.१७६ ते कुरुंद शिव गट क्र.५५१ लगत | १५०० | १५०००००० | ११२५००० |
| ८९ | | निघोज | कूकडी | फक्त गट क्र.८७ लगत | २५०० | २५०००००० | १८७५००० |
| ९० | | वडनेर बुद्रुक | कुकडी | गट क्र.९४० ते ५१८ लगत | ४५० | ४५००००० | ३३७५०० |
| ९१ | | पोखरी | मुळा | गट क्र.४३० ते ४३६ लगत | १०००० | ११७३०००० | ८७९७५०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ९२ | **शेवगांव** | मुंगी साठा क्र.१ | गोदावरी | गट क्र.६९१,६९२,६६८,६८९,६९० लगत | ७५०० | ३५०१७५०० | २६२६३१२५ |
| ९३ | | मुंगी साठा क्र.२ | गोदावरी | गट क्र.६९३,६९४,लगत | ९००० | ९०००००० | ६७५०००० |
| ९४ | | मुंगी साठा क्र.३ | गोदावरी | गट क्र.५/१ लगत | ९००० | १२४२०००० | ९३१५००० |
| ९५ | | मुंगी साठा क्र.४ | गोदावरी | गट क्र.५/२ लगत | ८५०० | ११७३०००० | ८७९७५०० |
| ९६ | | मुंगी साठा क्र.५ | गोदावरी | गट क्र.६, ७, ८ लगत | ७००० | ७०००००० | ५२५०००० |
| ९७ | | मुंगी साठा क्र.६ | गोदावरी | गट क्र.९, १०, ११ लगत | ७००० | ७०००००० | ५२५०००० |
| ९८ | | मुंगी साठा क्र.७ | गोदावरी | गट क्र.१३, १४, १५ लगत | ७००० | ७०००००० | ५२५०००० |
| ९९ | | मुंगी साठा क्र.८ | गोदावरी | गट क्र.१८ व १९ लगत | ७००० | ७०००००० | ५२५०००० |
| १०० | | मुंगी साठा क्र.९ | गोदावरी | गट क्र.२० व २३ लगत | ७००० | ७०००००० | ५२५०००० |
| १०१ | | वरुर बु. वरुर खु. | नांदणी | वरुर खुर्दचे उत्तरेस गट नं.११,१७,३३,१०४,३१,३२,३०,२७,२८ ,२९ व वरुर बुद्रुकचे दक्षिणेस ८,९,१०,११,१२,१७,२०,२१,२२,२३,२४ ,२६,३१,३९,३८,४४ | २००० | २०००००० | १५००००० |
| १०२ | | खरडगांव | नांदणी | गट क्र.३५७ ते ३६९, ३८७ ते ४००, ४०१,४३६,४३९ ते ४४३, ४४४ ते ४७९, ३९८ ते ४९५ | ३००० | ३०००००० | २२५०००० |
| १०३ | | आखेगांव तितर्फा | नांदणी | ४६४, ४६५,४६६,४६८,४६९,४७२ ते ४७६,४७८ ते ४८०, ४८५,४९६ ते ५०३,५१० ते ५१८, ४९५ ते ४९७, ४१४,४१०,४०९,४००,३९६,३९५, ३९३, ३८२ ते ३८७,५३० | ५००० | ५०००००० | ३७५०००० |
| १०४ | | डोंगर आखेगांव | नांदणी | गट क्र.२७,३१,३२,३५ ते ३८ | १००० | १०००००० | ७५०००० |
| १०५ | | सामनगांव | ढोरा | ग.नं.१२९, १३०, १३१, २२, २३, २४/२ | ४०० | ४००००० | ३००००० |
| १०६ | | वडुले बुद्रुक | ढोरा | ग.नं.३१० ते ३१४ | १०० | १००००० | ७५००० |
| १०७ | | आखतवाडे | ढोरा | ग.नं.३० ते ३२ | ९०० | ९००००० | ६७५००० |
| १०८ | | ढोरजळगांव शे. | ढोरा | ग.नं.४१ | २०० | २००००० | १५०००० |
| १०९ | | मलकापूर | ढोरा | गट नं.११२, ११७, ११८, १२५, १२९, १३०, १२६ ते १२८ | ३०० | ३००००० | २२५००० |
| | | **एकुण** | | | **४९७७००** | **५३३५९७५००** | **४००१९८१२५** |

ज्या इसमांना फेरलिलावात बोली बोलावयाची आहे त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात नेमून दिलेल्या तारखेस व वेळेस उपस्थित राहून फेरलिलावात भाग घ्यावा. फेरलिलाव निविदा पध्दतीने तसेच जाहीर बोलीने होणार आहेत. ज्या पध्दतीत शासनास जास्त रक्कम प्राप्त होईल त्याप्रमाणे लिलाव अंतीम मंजूर करण्यात येतील.

१) लिलावाच्या निविदा भरु इच्छिणाऱ्या व्यक्तींना निविदा अर्जाचे शुल्क रु.२,०००/- चलनाने भरावे लागेल. निविदा विक्रीची सुरुवात **दिनांक २३/०२/२०१२** पासुन सुरु होईल. सदर निविदा कार्यालयीन वेळेत

(शासकीय सुटटीचे दिवस वगळून) १०.३० ते १५.३० या वेळेत विक्रीसाठी उपलब्ध राहतील. प्रत्येक वाळूसाठयासाठी स्वतंत्र निविदा भरणे आवश्यक आहे.

२) लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी प्रत्येक वाळू साठयासाठी अपसेट प्राईसच्या **३%** रक्कम अनामत रक्कम म्हणून लिलावात भाग घेतेवेळी रोखीने भरावी लागेल. लिलावात भाग घेणेपूर्वी किमान १ तास आधी सदरची रक्कम भरणे आवश्यक आहे.

३) निविदा भरणाऱ्यांनी प्रत्येक वाळू साठयासाठी अपसेट प्राईसच्या **३%** रक्कम अनामत रक्कम म्हणून सिलबंद निविदा देते वेळी राष्ट्रीयकृत बॅकेच्या धनाकर्षाने (DEMAND DRAFT) भरावी लागेल. सिलबंद निवीदा **दिनांक ०१/०३/२०१२ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंतच** जिल्हाधिकारी कार्यालय, गौणखनिज शाखा, अहमदनगर येथे स्विकारण्यात येतील.

४) निविदेसोबत जोडलेला डिमांड ड्राफ्ट संबंधित तहसिलदार यांचे नावाने काढलेला असावा.

५) निविदाद्वारे भाग घेणाऱ्या किंवा जाहीर लिलावात भाग घेणाऱ्या लिलावधारकाने नियमित आयकर भरत असल्याचा पुरावा, पॅन क्रमांक व विक्रीकर विभागाचा TIN क्रमांक असलेल्या लिलावधारकांनांच लिलावात सहभागी होता येईल.

६) निविदाद्वारे भाग घेणाऱ्या किंवा जाहीर लिलावात भाग घेणाऱ्या लिलावधारकाने पत्त्याबाबत तलाठी यांचेकडील निवासी दाखला/ पारपत्र/ वाहनचालक दाखला/ निवडणून ओळखपत्र/ विद्युत देयक/ फोन देयक इ अथवा कोणतेही दस्तऐवज ज्यात कायम राहण्याचा पत्ता नमुद आहे. अशा दस्तऐवजची प्रत देणे आवश्यक आहे.

७) ज्या बोलीदाराची सर्वोच्च बोली / निविदा स्विकारण्यात येईल, त्याने मंजूर लिलावाच्या किंमतीच्या १/४ रक्कम लिलावाचे दिवशी रोख किंवा डि.डी.च्या स्वरुपात भरणे लिलावधारकांवर भरणे बंधनकारक आहे. सदरची १/४ रक्कम न भरल्यास लिलाव रद्द करण्यात येऊन अनामत रक्कम जप्त करणेत येईल याची नोंद घ्यावी. लिलावाची १/४ रक्कम भरल्यानंतर लगेच त्यांच्याकडून उर्वरित ३/४ रक्कम लिलावाच्या तारखेपासून १५ दिवसात भरण्याचे दायित्व स्विकारणाऱ्या दोन व्यक्तीसह लिलाव घेणाऱ्या व्यक्तीने स्वखर्चाने रु.१००/- रकमेच्या मुद्रांकित कागदावर (स्टॅम्प पेपर) करारनामा करुन देण्यात यावा.

८) उर्वरित ३/४ रक्कम लिलावाचे तारखेपासून १५ दिवसाचे विहीत कालावधीत भरणे आवश्यक आहे. सदर रक्कम विहीत मुदतीत न भरल्यास त्याला लिलाव गटाचा ताबा देता येणार नाही. त्यांनी भरलेली १/४ रक्कम जप्त करणेत येईल. १/४ व ३/४ रक्कम विहीत केलेल्या मुदतीत लिलावधारकाने भरणे आवश्यक आहे. याबाबत लिलावधारकास कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ दिली जाणार नाही.

९) विक्रीकर विभागाकडून आकारला जाणारा कर सर्वोच्च बोली बोलणाऱ्या लिलावधारकाने भरणे बंधनकारक राहील. लिलावरकमेच्या २% आयकर, २% पर्यावरण शुल्क भरणे आवश्यक आहे.

१०) सर्वोच्च बोली बोलणाऱ्या लिलावधारकांस जिल्हयातील वाळू गटांचे सर्वेक्षण भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, अहमदनगर यांचेकडून करणेत आलेली असलेने सर्वेक्षणापोटी रक्कम रुपये ५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त) इतक्या रकमेचा डि.डि. **'संचालक, महाराष्ट्र भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पूणे'** यांचे नांवाने काढणेत येऊन सदर डि.डि. जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करावा लागेल.

११) वरिल बार्बीची पूर्तता केल्यानंतरच सर्वोच्च बोली बोलणाऱ्या लिलावधारकांस लिलाव मंजूरीचे आदेश व वाळू गटांचा ताबा नियमानुसार देण्यात येईल.

१२) लिलावाच्या सविस्तर अटी व शर्ती, तसेच वाळूसाठयांची सविस्तर माहिती जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय व तहसील कार्यालय येथे कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील. तसेच www.ahmednagar.nic.in या संकेत स्थळावर पाहता येतील.

१३) या व्यतिरिक्त शासनाकडून याबाबत देण्यात येणारे आदेश सुचना निर्णय तसेच आयुक्त/ जिल्हाधिकारी यांचेकडून आदेश सूचना/ निर्णय लिलावधारकांवर बंधनकारक राहतील.

१४) खुल्या (जाहीर) लिलावाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच सिलबंद निवीदा उघडणेत येतील. खुल्या (जाहीर) लिलाव व बोलीतील सर्वोच्च रक्कम तसेच सिलबंद निवीदेतील सर्वोच्च नमूद रक्कम यापैकी जी सर्वोच्च रक्कम असेल ती निवीदा/खुली जाहिर बोली सर्वोच्च बोली म्हणून अंतिम करण्यात येईल. निविदा /खुले (जाहीर) लिलावातील बोली स्वीकारणे किंवा नाकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना राहतील.

१५) शासन निर्णय दि.२५/१०/२०१० नुसार काळया यादीतील इसमांना लिलाव घेण्यास प्रतिबंध करण्यात येईल.

सही/XXX
(डॉ.संजीवकुमार)
**जिल्हाधिकारी अहमदनगर**

क्र गौख/४-क/वाळूलिलाव/कावि- ३००/२०१२,
जिल्हाधिकारी कार्यालय, गौण खनिज शाखा,
अहमदनगर दि.२१/०२/२०१२

**प्रतिलीपी - (जाहीर प्रगटनाचे प्रतीसह)**

**१)** जिल्हा माहिती अधिकारी, अहमदनगर यांना माहिती व विस्तृत प्रसिध्दीकरिता, (बातमी रुपाने प्रसिध्दीसाठी सस्नेह अग्रेषित.

**२)** मा.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय मुंबई यांना माहितीस्तव सादर.

**३)** मा.उपसचिव, महसूल व वन विभाग(ख), मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

**४)** मा.संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, नागपूर यांचेकडेस माहितीस्तव सादर.

**५)** मा.विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांना अवलोकनार्थ व त्यांचे कार्यालयातील नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी सविनय सादर.

**६)** मा.जिल्हाधिकारी, नाशिक/ पुणे/ औरंगाबाद/ बीड/ सोलापूर/ उस्मानाबाद/ ठाणे यांना माहिती व त्यांचे कार्यालयातील नोटीस बोर्डवर जाहीर प्रसिध्दीसाठी सस्नेह अग्रेषित.

**७)** तहसीलदार . . . . . . . / उपविभागीय अधिकारी, नगर/ श्रीरामपूर/ संगमनेर/ कर्जत यांना सस्नेह अग्रेषित,

त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त जाहीर लिलावास विस्तृत प्रसिध्दी द्यावी. तसेच गाव पातळीवरही दवंडी रुपाने प्रसिध्दी देऊन प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास सादर करावेत. लिलाव घेण्यास इच्छुक व्यक्ति/ संस्था यांना वाळूपट्ट्यासंबंधी व लिलावाच्या अटी व शर्तीचे संदर्भात आवश्यक ती माहिती द्यावी. तसेच तहसीलदार यांनी वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, अहमदनगर यांच्या शिफारशीप्रमाणे उपलब्ध वाळूसाठ्याची माहिती व नदीपात्राचा तपशील इत्यादी बद्दलची माहिती संबंधितांना द्यावी.

सही/XXX
**जिल्हाधिकारी अहमदनगर**

## -: वाळू लिलावाच्या अटी /शर्ती :-

**१)** वाळू गटासाठी निश्चित करण्यात आलेल्या अपसेट प्राईस (हातची किंमती) पेक्षा अधिक बोलीने लिलावाला सुरुवात करण्यात येईल.

**२)** लिलावात बोलण्यात आलेल्या बोलीच्या रकमा तसेच निविदाद्वारे प्राप्त झालेले देकार हातच्या किंमतीपेक्षा जास्त नसल्यास विभागीय आयुक्तांच्या निर्देशास अनुसरुन त्या वाळू गटाचा १५ दिवसाच्या आत फेरलिलाव करण्यात येईल.

**३)** लिलावात भाग घेऊ इच्छिणा-या व निविदा भरु इच्छिणा-या प्रत्येक व्यक्तीला अनामत रक्कम लिलाव सुरु होण्याच्या १ तासापूर्वी / निविदेचा अर्ज सादर करतांना जिल्हाधिकारी कार्यालयात रोखीने भरावी लागेल. ज्या बोलीदाराची अत्युच्च बोली / निविदा स्विकारण्यात येईल, त्याची रक्कम नियमानुसार त्याने भरावयाच्या बोलीच्या १/४ इतक्या सुरक्षितता रकमेत समायोजित करण्यात येईल. ज्या बोलीदारांची बोली / निविदा स्विकारण्यात येणार नाहीत, त्यांच्या अनामत रकमा लिलाव संपल्यानंतर लिलावाच्या ठिकाणीच रोखीने परत करण्यात येतील.

**४)** लिलावाने घ्यावयाच्या रेती / वाळू स्थळात अपेक्षित वाळूसाठा आहे किंवा नाही, वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत लिलावधारकाची राहील.

**५)** ज्या बोलीदाराची बोली / निविदा स्विकारण्यात येईल त्याला त्याने दिलेल्या बोलीच्या रकमेच्या १/४ इतकी रक्कम लिलाव संपताच विहित मुदतीत प्रकरणपरत्वे जिल्हाधिकारी कार्यालयात भरावी लागेल.

**६)** लिलावातील / निविदेतील सर्वोच्च बोलीचा देकार स्वीकारावयाचा किंवा नाकारावयाचा निर्णय जिल्हाधिकारी घेईल व सदर निर्णय संबंधितास लिलावाच्या दिवशीच कळविण्यात येईल.

**७)** लिलावातील/निविदेतील सर्वोच्च बोली स्वीकारल्या नंतर व १/४ रक्कम भरल्या नंतर १५ दिवसांत बोलीची उर्वरित रक्कम भरण्यात येईल अशा हमीचे दायीत्व स्वीकारणा-या दोन व्यक्तींसह लिलावधारक स्वखर्चाने खरेदी केलेल्या रुपये १००/- इतक्या रकमेच्या मुद्रांकीत (स्टॅम्प पेपर) कागदावर करारनामा करुन देईल. असे करारपत्र करुन न दिल्यास त्याने भरलेली १/४ रक्कम जप्त करण्यात येईल व संबंधीत रेती / वाळू गटाचा फेरलिलाव करण्यात येईल. तसेच विहित कालावधीत वरील प्रमाणे करारपत्र न केल्याच्या परिणामी लिलावधारकास होणा-या कोणत्याही नुकसानीची जबाबदारी शासनावर राहणार नाही. लिलावाच्या बोलीतील रकमेपैकी वरील अ.क्र.५ प्रमाणे भरलेली रक्कम वजा जाता शिल्लक राहीलेली ७५% रक्कम सर्वोच्च बोली स्विकारल्यापासून १५ दिवसात एक रकमी भरावी लागेल. लिलावधारकाने शिल्लक राहीलेली ७५% रक्कम भरल्यानंतर व करारपत्र केल्यानंतर, त्याला वाळू स्थळाचा प्रत्यक्षात ताबा उशीरात उशीरा सात दिवसात देण्यात येईल.

**८)** रेती / वाळू (ठेका) लिलाव ज्यावेळी रद्द करण्यात येईल अशा वेळेस त्या रेती / वाळू क्षेत्राचा नव्याने लिलाव करण्यात येईल. फेरलिलावात पूर्वीच्या लिलावाच्या किंमतीपेक्षा कमी किंमत आल्यास फरकाची रक्कम पूर्वीच्या लिलावधारकाकडून जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल. तथापि फेरलिलावात पूर्वीच्या किंमतीपेक्षा अधिक (जादा) किंमत आल्यास त्यावर पूर्वीच्या लिलावधारकास कोणताही हक्क राहणार नाही.

**९)** लिलावधारक, त्यांच्या लिलाव क्षेत्रातील ज्या ठिकाणातून रेती / वाळू काढण्याने धूप होऊ शकेल व त्यामुळे निवासी इमारतींना, घरे अथवा इतर बांधकामे यांना धोका निर्माण होईल अशा ठिकाणातून वाळूचे स्वत: उत्खनन करणार नाही अथवा इतरांना तसे करण्यास परवानगी देणार नाही. अशा प्रकरणी उत्खनन करण्यास प्रतिबंध करणारे जिल्हाधिका-यांचे निर्णय अंतिम असतील.

**१०)** विहित केलेल्या मर्यादेच्या पलिकडे असलेल्या क्षेत्रातून रेती / वाळूचे उत्खनन करता येणार नाही. तसेच इतर व्यक्तींच्या खाजगी मालकीच्या जमिनीतून, अशा जमिनी लिलावाने देण्यात आलेल्या क्षेत्रात समाविष्ट असल्या तरी, रेती / वाळू काढता येणार नाही तसेच रस्ते/पायवाट म्हणून वापरण्यात येणा-या जमिनीतून रेती / वाळू काढता येणार नाही.

**११)** जिल्हाधिका-याला खाडी पात्रातील नौकानयन मार्गातील अडथळे दुर करणे तसेच जल-जीवन व जल संपत्तीच्या हिताच्या दृष्टीने खाडी क्षेत्रातील रेती उत्खननासाठी ड्रेझर्सचा वापर करण्यावर उचित बंधने घालता येतील.

**१२)** कोणत्याही रेल्वेच्या पुलाच्या कोणत्याही बाजूने ६०० मीटर्स (२००० फूट) अंतराच्या आत रेतीचे उत्खनन करता येणार नाही. तसेच जेथे नदी - नाल्यांवर पूल आहेत, त्याच्या स्तंभापासून १०० मीटर्सपर्यंत उत्खनन करता येणार नाही.

**१३)** जेथे वाळू उत्खनन चालू आहे त्या ठिकाणी फलक लावून उत्खनन क्षेत्राची सीमा निश्चित करुन दर्शविण्यात यावी.

**१४)** वाळूचे/रेतीचे उत्खनन करताना किंवा ती काढताना खाजगी मालमत्तेस कोणतीही हानी/नुकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायित्व लिलावधारकावर राहील. अशा हानीची /नुकसानीची परिगणना सक्षम अधिका-याकडून करण्यात येईल व त्या बाबतचा त्याचा निर्णय अंतिम राहील व अशी रक्कम थकीत जमीन महसूलाच्या वसूलीप्रमाणे संबंधीत लिलावधारकाकडून वसूल करण्यात येईल.

**१५)** लिलावाने दिलेल्या ठेक्याच्या कालावधीत शासनाने तो ठेका रद्द केल्यास किंवा त्याला मंजूर केलेल्या क्षेत्राचे उत्खनन करण्यास किंवा रेती / वाळू काढण्यास बंदी घातल्यास लिलावधारकास शासनावर खटला भरता येणार नाही. परंतु लिलावाची मुदत संपण्यापूर्वी ज्या कालावधीसाठी ठेका रद्द केला जाईल त्या कालावधीसाठी, त्याने ज्या किंमतीला लिलाव घेतला त्या रकमेच्या प्रमाणात त्याला परतावा देण्यात येईल. अशी रक्कम परत करतांना लिलावाची देकाराची रक्कम लिलावातील अंदाजीत वाळूसाठा व प्रत्यक्ष उत्खनन केलेला वाळूसाठा विचारात घेऊन त्यानुसार परताव्याच्या रकमेची परिगणना करण्यात येईल.

**१६)** उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या वाळूची/रेतीची साठवणूक, लिलाव ज्या जिल्हाधिका-याने केला असेल त्याच जिल्हयात करावी लागेल व त्यासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी लिलाव धारकाची असेल. वाळू/रेती ठेक्याची मुदत संपण्यापूर्वी ज्या वाळू / रेतीचे उत्खनन केलेले आहे त्या वाळूचा/रेतीचा साठा मुदत संपल्यानंतर १० दिवसात उत्खननाच्या जागेवरुन हलविण्यात

आला नाही तर तो शासनाच्या मालकीचा होईल व अशा वाळूच्या / रेतीच्या किंमतीबाबत अथवा मालकीबाबत लिलावधारकास अथवा त्यांच्या ठेकेदारास कोणताही हक्क सांगता येणार नाही किंवा त्याबाबत शासनाविरुध्द दावा करता येणार नाही.

**१७)** लिलावाने दिलेल्या क्षेत्रातील वाळूच्या रेतीच्या वाहतूकीसाठी आवश्यक परवाने / पासेस पुस्तके लिलावधारकाला जिल्हाधिकारी कार्यालयाकडून उपलब्ध करुन देण्यात येतील. असे पासेस उपलब्ध करुन देताना लिलावधारकास वाळूगटात उपलब्ध असलेला अंदाजीत वाळूसाठा व उत्खनन विचारात घेऊन आवश्यक तेवढेच पासेस पुस्तके लिलावधारकास देण्याबाबत. जिल्हाधिकारी कार्यालयाने दक्षता घ्यावी, असे वैध परवाने/पासेस धारण करणा-यांनाच वाळू/रेतीची वाहतूक करता येईल.

**१८)** लिलावधारकास वाळूची / रेतीची वाहतूक करण्यासाठी परवाना द्यावयाचा असल्यास त्याने सहकारी संस्था/संस्थांना प्राधान्य दिले पाहिजे.

**१९)** लिलावधारकाने जिल्हा परिषद कर / पंचायत कर विहीत केल्याप्रमाणे अदा करण्यात यावा.

**२०)** प्रत्येक वाहतूक पावतीवर जिल्हा खनिकर्म अधिकारी यांची सही व शिक्का आवश्यक राहील. सर्व जिल्ह्यात याच पध्दतीने वाहतूक पावती देणे बंधनकारक राहील. लिलावाची पूर्ण रक्कम भरल्यानंतर वाळूसाठ्याइतके उत्खनन करण्याचा कायदेशीर अधिकार लिलावधारकास प्राप्त होईल व त्यानुसार अंदाजित वाळूसाठ्याइतकेच उत्खनन / वाहतूक परवाने लिलावधारकास देण्यात यावे.

**२१)** लिलावधारकाने त्याला वाटप केलेल्या/मंजूर केलेल्या क्षेत्राच्या सीमा दर्शविणारे खांब उभारावे. तसेच सक्षम प्राधिका-यांच्या पूर्व परवानगीने नेमलेल्या त्याच्या उपठेकेदाराचे नांव, पत्ता व जागेचा तपशिल दर्शविणारा फलक योग्य ठिकाणी लावणे आवश्यक आहे.

**२२)** लिलावाद्वारे विक्री केलेल्या स्थळाचा किंवा रेती / वाळू ठेक्याचा कालावधी जास्तीत जास्त एक वर्षाचा राहील व तो सर्व साधारणत: १ ऑगस्ट ते ३१ जुलै असा राहील. लिलाव घेण्याची तारीख काहीही असली तरी लिलाव वर्षाच्या ३१ जुलै रोजीच संपुष्टात येईल. लिलावाने दिलेल्या क्षेत्रातून करारात नमूद केलेल्या कालावधीत, परवानगी दिलेल्या साधनाच्या सहाय्यानेच वाळूचे/रेतीचे उत्खनन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. वाळू स्थळात अपेक्षित साठा नाही, रस्ते उपलब्ध नाहीत, वाळू स्थळात पाणी आहे अशा तसेच मानवी वा नैसर्गिक आपत्तीच्या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही व वाळूगट बदलून दिला जाणार नाही.

**२३)** उत्खनन केलेल्या वाळूच्या / रेतीच्या वाहतूकीसाठी अस्तित्वात असलेले रस्तेच लिलावधारकाने वापरावयाचे आहेत. तसेच वाहतुकीसाठी वेगळे रस्ते उपलब्ध करुन दिले जाणार नाहीत. तसेच वाहतुकीसाठी नवीन रस्ता मिळविण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. रस्ते उपलब्ध नाहीत किंवा वाहतुकीसाठी बंद आहेत या कारणास्तव कोणत्याही परिस्थितीत रेती/वाळू उत्खननाचा कालावधी वाढवून दिला जाणार नाही अथवा रेती/वाळूघाट बदलून दिला जाणार नाही.

**२४)** नदीपात्रातून /नाल्यातून अथवा त्याला रेती /वाळू उत्खनन करण्यासाठी ज्या क्षेत्राचे वाटप केले असेल त्या क्षेत्रातून रेती/वाळू उत्खनन करताना नैसर्गिक संपत्तीस व पर्यावरणास धोका होणार नाही याची सर्व खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

**२५)** रेतीचे/वाळूचे नदीपात्रातून/नाल्यातून ५ फूट किंवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने सर्वेक्षणानंतर विहीत केलेल्या खोलीपेक्षा जास्त उत्खनन करण्यात येऊ नये. तसेच नदीपात्र/नाला यांचे पात्र बदलून अथवा त्यांना हानी पोहोचवून पर्यावरणाचे नुकसान होणार नाही याचीही खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

**२६)** लिलावधारकाने गावक-यांच्या निस्तार हक्कांस बाधा पोहोचविता कामा नये.

**२७)** रेती/वाळू उत्खनन करताना अथवा हलविताना अपघात झाल्यास लिलावधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात द्यावी.

**२८)** लिलावधारकाने रेतीच्या/वाळूच्या वाहतुकीसाठी सक्षम प्राधिका-यांनी म्हणजे जिल्हा खनिकर्म अधिका-याने प्रमाणित व स्वाक्षरित केलेली वाहतूक पावती वाळू / रेतीची वाहतूक करणा-या प्रत्येक वाहनासोबत दरवेळी देणे आवश्यक आहे. लिलावधारकाने त्याच्या लिलावस्थळातील रेती / वाळूची वाहतूक करणा-या वाहनास त्याच्या वहन क्षमते इतक्याच परिमाणाची वाहतूक पावती द्यावी. कोणतेही वाहन त्यापेक्षा अधिक परिमाणाची रेती / वाळू वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण गौणखनिज अवैध आहे असे समजून त्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतूकीबाबत मोटर वाहन कायद्यानुसार कारवाई करावी. दंडनीय कारवाईबरोबर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात यावा. त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेती / वाळूचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतूक केलेल्या रेतीबाबतची दैनंदिन हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ही नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरिक्षक, महसूल अधिकारी तसेच जिल्हाधिकारी व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरिक्षण करणा-या अधिका-यांसाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करुन द्यावीत.

**२९)** गौण खनिजाच्या उत्खननाचे, विक्रीचे व वाहतूकीच्या संबंधातील सर्व हिशोब व कागदपत्रे, लिलावाने / भाडेपट्ट्याने दिलेल्या जागेवर ठेवली पाहिजे. आणि सदरहू हिशोब व कागदपत्रे संबंधित महसूल अधिकारी, खनिकर्म अधिकारी तसेच भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या अधिपत्याखालील अधिका-यांच्या निरिक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावीत.

**३०)** लिलावधारकाने करारनामा करतेवेळी लिलावाच्या अटी व शर्तीचे यथोचित पालनार्थ रक्कम रु.१०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) किंवा अपसेट प्राईसच्या **३%** यापैकी अधिक असेल तेवढी रक्कम अनामत रक्कम म्हणून जिल्हाधिकारी यांच्याकडे ठेवणे आवश्यक आहे. ही रक्कम लिलावधारकाने लिलावाचे मुदतीत सर्व अटी व शर्तीचे योग्यरित्या पालन केल्यास, लिलावाची मुदत संपल्यावर परत करण्यात येईल.

**३१)** लिलावधारकाने नियमात नमुद केल्याप्रमाणे अटी व शर्तीचे तसेच गौण खनिज उत्खनन नियमातील तरतूदी नुसार असलेले नियम (संबधीत विभागास लागू असलेले नियम) आणि तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतुदी नुसार लागू असलेल्या नियमाचे पालन करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेतीचा/वाळूचा पूर्ण उपयोग गौण खनिज म्हणूनच केला पाहिजे.

**३२)** रेतीचे/ वाळूचे उत्खनन करतेवेळी जर काही प्रमुख खनिज आढळून आल्यास लिलावधारकाने/ठेकेदाराने विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांच्याकडे सात दिवसात कळविले पाहीजे.

**३३)** खाडी पात्रात ड्रेझरव्दारे रेती उत्खनन करणाऱ्या ड्रेझरधारकाने पर्यावरण विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचनेस अनुसरुन ड्रेझर्ससाठी परवानगी घेताना सर्व ड्रेझर्सची यादी एकत्रितपणे पर्यावरण विभागास सादर करावी. पर्यावरण विभागाने नाहरकत प्रमाणपत्राबाबत १५ दिवसात निर्णय घेणे अनिवार्य आहे. तसा निर्णय न घेतल्यास संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल. तसेच लिलावधारक / परवानाधारक यांना पर्यावरण विषयक व तटीय विनियमन नियमाच्या तरतूदींचे पालन करणे बंधनकारक आहे.

**३४)** कोल्हापूर पध्दतीचे बंधारे असलेल्या ठिकाणी पाटबंधारे विभाग / विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांनी निश्चित केलेल्या अंतराच्या मर्यादेचे बंधन पाळणे आवश्यक असेल.

**३५)** सार्वजनिक पाणवठा / पाणी पुरवठा व्यवस्था असलेल्या ठिकाणापासून १०० मिटर अथवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा निश्चित करेल तेवढया अंतरापलिकडे उत्खनन करणे आवश्यक आहे.

**३६)** वाळूची वाहतूक करतांना वाहनातील वाळू प्लास्टीक पेपरने/ताडपत्रीने आच्छादित करुनच वाळूची वाहतूक करणे बंधनकारक आहे.

**३७)** अंदाजित परिमाणापेक्षा अधिक वाळूसाठा रेतीगटात असल्यास त्यावर लिलावधारकाचा कोणताही अधिकार राहणार नाही व अंदाजित परिमाणापेक्षा अधिक उत्खनन करण्यास लिलावधारकास परवानगी देता येणार नाही.

**३८)** निवीदा अर्जाचे शुल्क रु. २०००/-(अक्षरी रुपये दोन हजार ) (नापरतावा) राहील.

**३९)** लिलावात भाग घेण्यासाठी नियमीत आयकर भरत असल्याचा साक्षांकित पुरावा, पॅन कार्डाची साक्षांकित छायाप्रत, विक्रीकर विभागाचे TIN प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत व रहिवासी पुराव्याची साक्षांकित छायाप्रत आवश्यक राहील.

**४०)** मा.न्यायालयाने कोणत्याही वाळूपट्टयाबाबत/ लिलावाबाबत काही आदेश/ निर्णय दिल्यास सदर आदेश/ निर्णय लिलावधारकांवर बंधनकारक राहील तसेच रिट याचिका क्र.४८३०/२०१० मध्ये दिनांक २६/१०/२०१० रोजी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या निर्णयातील सर्व मार्गदर्शक सुचना लिलावधारकांवर बंधनकारक राहील.

**४१)** ज्या व्यक्तीची बोली/निवीदाचा सर्वोच्च देकार स्विकारण्यात येईल त्याने त्याच दिवशी सर्वोच्च बोली/ निवीदेची १/४ रक्कम रोखीने जमा करणे आवश्यक राहील नसता त्या व्यक्तीने जमा केलेली रक्कम जप्त करुन शासन जमा करण्यात येईल.

**४२)** ज्या व्यक्तीची बोली/ निवदीचा सर्वोच्च देकार स्विकारण्यात येईल त्याने त्याच दिवशी सर्वोच्च बोली/ निवीदेची १/४ रक्कम रोखीने जमा केल्यानंतर उर्वरीत ३/४ रक्कम लिलावाचे दिवसापासून १५ दिवसाच्या विहित कालावधीत न भरल्यास त्याने भरणा केलेली १/४ रक्कम जप्त करण्यात येईल.

**४३)** आयकर अधिनियमातील तरतुदीनुसार लिलावाच्या उच्चतम रकमांचे अनुषंगाने टीडीएस देणे लिलावधारकावर बंधनकारक राहील. तसेच लिलाव घेणाऱ्या व्यक्तीस विक्रीकर व आयकर खात्यातर्फे आकारण्यात येणारे सर्व प्रकारचे कर भरणे बंधनकारक राहील.

**४४)** लिलाव घेणाऱ्या व्यक्तीस रुपये ५०००/- (रुपये पाच हजार) इतक्या रकमेचा संचालक, महाराष्ट्र भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांच्या नावे काढण्यात आलेला धनादेश सर्वेक्षण शुल्कापोटी लिलावाच्या दिवशी जमा करावा लागेल.

**४५)** लिलाव घेणाऱ्या व्यक्तीस पर्यावरण शुल्कापोटी लिलावात गेलेल्या वाळूच्या स्वामित्वधनावरील मुल्याच्या २% रक्कम ही पर्यावरण शुल्क म्हणुन द्यावी लागेल.

**४६)** वाळूचे उत्खनन मनुष्यबळ व टोपली, घमेली व फावडयाद्वारेच करावे लागेल. कोणत्याही परिस्थितीत यांत्रिक साधनांचा वापर करता येणार नाही. वाळु उत्खननासाठी सक्शन पंपाचा वापर अनुज्ञेय नाही. तथापी सार्वजनिक हितार्थ अपवादात्मक परिस्थितीत सक्शन पंपाचा वापर करण्यासाठी भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा व पर्यावरण विभाग यांचे अभिप्राय घेवुन त्यास शासनाची मान्यता घेण्यात येईल.

**४७)** जिल्हाधिकारी यांचे पुर्व परवानगी शिवाय लिलावधारकास लिलाव ठेका दुसऱ्या कोणाकडेही हस्तांतरीत करता येणार नाही किंवा दुसऱ्या कोणालाही चालविण्यास देता येणार नाही किंवा लिलावनंतर भागीदारही घेता येणार नाही.

**४८)** लिलावाची संपुर्ण रक्कम जमा करुन आदेश घेत्यानंतर जास्तीत जास्त सात दिवसात वाळुपट्टयांचा ताबा घेण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. कोणत्याही कारणास्तव मुदतवाढ मिळणार नाही.

**४९)** वाळूचे उत्खनन केवळ सकाळी ६.०० ते सायंकाळी ६.०० या कालावधीतच करता येईल. या कालावधीनंतर केलेले उत्खनन अवैध समजून कारवाई करण्यात येईल.

**५०)** लिलावधारकाने त्यास नेमुन दिलेल्या जागेतून उत्खनन केलेल्या वाळूचे परिमाण व वाळु खरेदी करणाऱ्याचे नांव व पत्ता, वाहतुक पास क्रमांक, दिनांक दर्शविणारे मासिक विवरणपत्र प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

**५१)** अवैध वाळू/रेती साठा पकडल्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील ४८(७) व (८) नुसार कारवाई करण्यात येईल.

**५२)** वाळू उत्खनन करताना अटी व शर्तीचे उल्लंघन करुन वाळूचे उत्खनन झाल्यास नियमबाहय वाळू उत्खननाने नदीकाठच्या गावातील पाण्याच्या व शेतीच्या पाण्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच वाळूच्या वाहतुकीमुळे नदीकाठच्या शेतीच्या रस्त्यांची हानी होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत विविध व्यक्ती व संस्थाकडून तक्रारी करण्यात येतात. अशा तक्रारीचे निवारण

करण्यासाठी तसेच चौकशी करण्यासाठी जिल्हयातील अधिकाऱ्यांची समिती गठीत करण्यात आलेली आहे. या समितीमध्ये खालीलप्रमाणे अधिकारी आहेत:-

| | |
|---|---|
| (१) जिल्हाधिकारी | - अध्यक्ष |
| (२) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद | - सदस्य |
| (३) सार्वजनिक बांधकाम विभागाचे जिल्हयातील कार्यकारी अभियंता | - सदस्य |
| (४) भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा यांचे जिल्हयातील किंवा यथास्थिती विभागातील वरीष्ठ अधिकारी | - सदस्य |
| (५) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचा अधिकारी | - सदस्य |
| (६) वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा | - सदस्य सचिव |

लेखी स्वरुपात तक्रार प्राप्त झाल्यानंतर वरील समिती झाल्यानंतर वरील समिती चौकशी करुन त्यांचे अहवाल जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करेल. यानंतर वाळूसाठयातून वाळू उत्खनन बंद करणे किंवा चालु ठेवणे याबाबतचा निर्णय जिल्हाधिकारी घेतील. जिल्हाधिकारी यांचा निर्णय मान्य नसेल अशा तक्रारदाराला संबंधीत विभागीय आयुक्ताकडे अपील करता येईल.

**५३)** नद्यांच्या पात्रातील काही वाळुस्थळांचा लिलाव करण्यात विरोध झाल्यास अशा वाळू स्थळांच्या लिलावासंदर्भात अंतिम निर्णय घेण्यासाठी मंत्री मंडळाची उपसमिती कडे पाठविण्यात येईल.

**५४)** पर्यावरण विभागाने वेळोवेळी दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करणे लिलावधारकास बंधनकारक राहील.

**५५)** एकदा जमा केलेली निविदा कोणत्याही परिस्थतीत परत केली जाणार नाही.

**५६) पर्यावरण विषयक अटी व शर्ती**

A) लिलावधारकाने सदर क्षेत्राचे भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (GSDA) यांचेमार्फत सर्वेक्षण करुन किती प्रमाणात, किती काळापर्यंत रेती उत्खनन करावे याचे प्रमाणपत्र घ्यावे व त्याची एक प्रत इकडेस उपलब्ध करुन द्यावी.

B) रेती उत्खनन करताना आजुबाजूचे विद्युत मनोरे, जलवाहिन्या, रेल्वे पूल इत्यादी राष्ट्रीय संपत्तीला व अतिमहत्वाच्या ठिकाणांना तसेच संवेदनशिल क्षेत्राला कोणत्याही प्रकारचा धोका पोहोचणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी. अशा प्रकाराचा धोका निर्माण झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित लिलावधारकावर राहिल व यासंदर्भात त्यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

C) विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केलेल्या सर्व अटींचे पालन करणे लिलावधारकास बंधनकारक राहिल. अन्यथा त्यांची लिलाव प्रक्रिया रद्द करण्यात येईल.

D) पर्यावरण संरक्षण कायद्यातील तरतुदींचा भंग झाल्यास पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत उत्खननाची देण्यात आलेली परवानगी रद्द करण्यात येईल.

E) यासंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

F) रेती उत्खननाच्या संदर्भात मा.उच्च न्यायालयाच्या कोणत्याही निर्णयाचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता संबंधित लिलावधारकाने घ्यावी.

G) दिनांक २५/०६/२००८ च्या पर्यावरण विभागाच्या परिपत्रकाच्या परिच्छेद "ब" नुसार संबंधित यशस्वी लिलावधारकाने याबाबत प्रत्यक्ष रेती उत्खननास परवानगी मिळण्याबाबतचा प्रस्ताव स्वतंत्रपणे आवश्यक त्या कागदपत्रांसह पर्यावरण ना हरकत अनुमतीसाठी पर्यावरण विभागाकडे करणे आवश्यक आहे.

H) पर्यावरणाचे संतूलन राखण्यासाठी निकामी वाळूचे साचलेले ढीग परत नदीचे पात्रातील वाळू उपसल्यामुळे झालेले खड्डे बुजविण्यासाठी उपयोगात आणावे. याबद्दल संपुर्ण जबाबदारी लिलावधारक यांची राहील.

I) लिलावधारक यांनी ठेका मंजूर झालेवर संक्शन पंपाव्दारे करण्यात येणा-या वाळू उत्खननासाठी शासनाची पर्यावरण अनुमती तसेच, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे संमतीपत्र प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. तथापि अशी अनुमती / संमतीपत्र न घेताच संक्शन पंपाव्दारे वाळु उत्खनन केल्यास सदर बाब गंभीर समजून पर्यावरण सरंक्षक कायदयातील तरतुदीचा भंग करणारी आहे. असे आढळून आलेस नियमानुसार आवश्यक ती कारवाई करणेत येईल.

**५७)** वाळू उत्खनन करताना कोणत्याही खाजगी अथवा सरकारी /जिवीताचे नुकसान होणार नाही याची दक्षता लिलावधारकाने घेणे आवश्यक आहे असे नुकसान झाल्यास त्यावर होणाऱ्या कायदेशीर कारवाई शिवाय होणाऱ्या नुकसानीस लिलावधारक हे जबाबदार राहतील.

**५८)** वाळू उत्खनन व वाहतुक करताना संबधीत ठेक्यावरील तसेच वाहतुक करणाऱ्या कोणत्याही इसमांकडून शासन निर्णय क्र.गौखनि१०/०२०८/प्रक्र३२/ख दिनांक २५/१०/२०१० मधील तरतूदींचे तसेच सर्व प्रचलित कायदे, नियम, शासन निर्णय याचे अनुपालन करणे बंधनकारक राहिल.

**५९)** लिलावाच्या जाहीर प्रगटनामध्ये कोणताही बदल करण्याचे, अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल करण्याचे लिलाव प्रक्रीयेत वेळेवर कोणताही निर्णय घेण्याचे तसेच लिलाव स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

सही/xxx

**जिल्हाधिकारी अहमदनगर**